# ।। मिश्रीत विषय को अंग ।।

# मारवाडी + मराठी

✻

महत्वाची सुचना:–  रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। मिश्रीत विषय को अंग ।।

कवित्त

अणभे ऊर संग फोज,अरथ आवध कुँ भाया ।
चर्चा घुरे निशान,तोफ दिष्टांग कहाया ।
ज्ञान भेद अमराव,राग जस सिंधु गावे ।
मत फोजा मे सुर,जोर समसेर बजावे ।
अे फोजा जिण पास हे,जासुं जुटे न कोय ।
सब ज्ञानी सुखराम कहे,कर धर सन्मुख होय ।।१।।

संताच्या अणभै ज्ञानाची साथ असणेच फौजची साथ असणे आहे.अर्थ करणे ही हत्यार आहे.चर्चा करतात ते ही निशाण म्हणजे ध्वज फड्कणे आहे,दृष्टांत देणे ही तोफ चालवणे आहे,ज्ञानाचा भेद सांगणे ही अमराव आहे.परमात्म्याचा गुणानुवाद रागाने गाणे हे सिंधु राग ऐकवणे आहे.सतस्वरुपाचा ज्ञानात मति दृढ होणे ही शुरवीरता आहे तसेच दूसऱ्यांना ही सतस्वरुप आनंद पदाचे ज्ञान देने हे जोराने समसेर चालवने आहे.ज्या संताजवळ ही फौज आहे त्यांचाशी कोणी लढू शकत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सर्व ज्ञानी हात जोडून समोर सनमुख होतात.।।१।।

पद बोले बाणी कहे,भजन करे भरपूर ।
सो पुरा सुखराम कहे,तां मुख बरसे नुर ।।२।।

जो हरजस बोलतो,वाणीद्वारा ज्ञान देतो आणि खुप भजन करतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ते पुर्ण संतच आहे.त्यांचा मुखावर सतशब्दाचा तेज बरसतो. ।।२।।

जो जन पहुँता शिखर मे,साखंज भरे अनेक।
सो हरीजन सुखराम के,ब्रम्ह स्वरुपी देख ।।३।।

जे संत शिखर म्हणजे केवल पद आनंद पदात पोहचलेले आहेत.त्यांची सर्व साक्ष देतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ते संत तर सतस्वरुप ब्रम्हचे रुपच आहे. ।।३।।

जिंग शब्द है गिगन मे,भंवर गुफा के मांय ।
सुन पारख सुखराम कहे,सुर नर देवल जाय ।।४।।

भंवर गुफेत जींग शब्दाची गर्जना होवून राहीली आहे.जसे मनुष्याचा देवतांचा देवळात गेल्यावर अनेक घंट्यांचा टाळ आदिचा ही आवाज येतो,असे भंवर गुफेत जींग ध्वनीची आवाज येते,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।४।।

इन्द्र पिलावे नीर रे,देश गांव घर जोय ।

**पुरा संत सुखराम के ,ज्यारा अे अंग होय ।।५।।**

इंद्र जसे देश.गाव घर सर्व जागी वर्षा करुन पानी पाजतो,तर त्या इंद्राला काय स्वार्थ आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असेच जे पोहचलेले संत आहे ते निस्वार्थ ने देश,गाव व घरात जावून उपदेश करतात.।।५।।

**पवन बाजे देश मे,बिन तेड्यो जग माय ।**

**पुरा संत सुखराम जी,ग्यान बतावे जाय ।।६।।**

हवा सर्व जागी सर्व देशात न बोलावता सर्व जागी बरोबर चालते,असेच पोहोचलेले संत ही सर्व जागी जावून ज्ञान देतात,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।६।।

**सुरज की क्या चाय हे,दोड्यो फिरे हमेश ।**

**यूँ पुरा संत सुखराम के ,मांड चेतावे देश ।।७।।**

सुर्याला काय चाहना आहे जो नेहमी पळत फिरतो,आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असेच पोहोचलेले संत ही सर्व जागी जावून ज्ञानद्वारे मनुष्याला चेतवतात. ।।७।।

**देश गांव घर शहर मे,करे उजालो आय ।**

**यूँ पुरा संत सुखराम जी,ग्यान बतावे आया ।।८।।**

ज्या तऱ्हेने सुर्य देश,गाव व शहरात आपला प्रकाश पोहचवतो,आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असेच पोहचलेले संत ही सर्व जागी जावून आपल्या ज्ञानाचा उपदेश देतात.।।८।।